# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## गोरेगांव (पूर्व) येथील जागृती हॉस्पीटलच्या प्रमुख कर्करोग व गायनालॉजीस्ट स्पेशालिस्ट (एम.डी.) महिला डॉक्टर यांचा बंगला बळकावण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(१) ३८४४५ (१२-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील (गोरेगांव पूर्व) फिल्मसिटी रोड येथील जागृती हॉस्पीटलच्या प्रमुख सुप्रसिद्ध कर्करोग व गायनालॉजीस्ट स्पेशालिस्ट (एम.डी.) महिला डॉक्टर यांची बजाज फायनान्स कंपनीने बंगला खरेदी प्रकरणात घेतलेल्या ३ कोटी ६ लाख रुपये कर्जापैकी १ कोटी ४३ लाख रुपये हफ्ते भरलेले असतानाही थकीत दाखवून नियमबाह्यपणे व सरफेसी ॲक्टचे उल्लंघन करुन बनावट कागदपत्राच्या आधारे मालमत्ता जप्तीचे आदेश कोर्टाकडून मिळवून त्यांचे बँक खाते एन्कॉर कंपनीला विक्री करुन आर्थिक फसवणूक करण्यात आली असून सदर प्रकरणात न्याय मिळण्याकरिता लोकप्रतिनिधींनी महिला डॉक्टर यांच्यासह मुख्यमंत्री व गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात स्थानिक पोलीसांनी दिनांक ३० मार्च, २०२१ व दिनांक ४ जून, २०२१ रोजी दाखल ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत अंतिम तपास व २९ दोषींना अटक करुन कारवाई करणेबाबत कोणतीच कार्यवाही न करता महिला डॉक्टर यांना बजाज कंपनीचे अधिकारी, सुरक्षा अधिकारी आणि संबंधित पोलीस अधिकारी यांनी हात बांधून व गंभीर मारहाण करुन त्यांचा बंगला बेकायदा जप्त केल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणात संबंधितांवर कारवाई करुन, महिला डॉक्टर यांना त्यांचा बेकायदा जप्त केलेला बंगला पुन्हा मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) नमूद दिनांकाचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, मे २०२२ मध्ये निरंक दिनांकाचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी दिनांक ३०.०३.२०२१ रोजी कुरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र १७५/२०२१ भा.दं.वि कलम ४२०, ४५२, ४४८, ३२३, ५०४, ५००, ४२७, ३८०, ५०६, ३४ अन्वये १४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक ०४.०६.२०२१ रोजी कुरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र ६६८/२०२१ भा.दं.वि कलम ३८०, ३४१, ३२३, ५०४, ५०६, ४२७, ४९९, ३४ सह अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ( अत्याचार प्रतिबंध ) अधिनियम कलम ३ (१), (ख)(छ) सह कलम ४ अन्वये २६ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बजाज फायनान्स कंपनीने मा. मुख्य महानगर दंडाधिकारी, एक्सप्लेनेड, मुंबई यांचे न्यायालयात फिर्यादीने कर्जाची परतफेड न केल्याच्या कारणास्तव फिर्यादीची मालमत्ता जप्त करणेकामी सरफेसी कायदा, १९८९ अन्वये दावा दाखल केला होता. त्यानुसार मा. मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लेनेड कोर्ट, मुंबई यांचेकडील दावा क्र २७९/एस ए/२०१९ यामध्ये माननीय न्यायालयाने नियुक्त कोर्ट रिसीव्हर यांनी मा. न्यायालयाचे आदेशान्वये दिनांक १०/१०/२०१९ रोजी पंचासमक्ष मालमत्ता ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील चार महिन्याच्या मुलीला तामिळनाडूतील एका सिव्हील इंजिनिअरला विकल्याबाबत**

**(२) ३८४७७ (१२-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामिळनाडूतील चार महिन्याच्या मुलीला एका सिव्हील इंजिनिअरला विकल्याच्या प्रकरणात मुंबईच्या व्ही.पी.रोड पोलीसांनी एका आरोपीला अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आरोपीचे नाव काय तसेच पोलीसांनी केलेल्या तपासात आरोपीने ॲडॉफशनचे कागदपत्रेही तयार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उक्त आरोपीसह एकूण ११ जणांना मुलीचे अपहरण करुन विकल्याच्या प्रकरणी अटक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यााबाबत आरोपींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) सदर प्रकरणी वि.प. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ०३/२०२२, कलम ३६३, ३७०(४), ३४ भा.द.वि. सह कलम ८१, ८७ जे. जे. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद चार महिन्याची बालिका ही मुंबईतील असून तमिळनाडू राज्यात तिची विक्री झाली होती.

(२) व (३) सदर प्रकरणी मुख्य आरोपी नामे इब्राहिम अल्ताफ शेख आणि आनंदकुमार नटराजन सह एकूण १४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. तपासात ॲडॉप्शनचे कागदपत्रे तयार केल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(४) सदर प्रकरणी वि.प. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ०३/२०२२, कलम ३६३, ३७०(४), ३४ भा.द.वि. सह कलम ८१, ८७ जे. जे. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मा. न्यायालयात दि. २२/०३/२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिला व बालकांवरील लैंगिक अत्याचाराला प्रतिबंध व गुन्ह्याच्या तपासासाठी नवीन मार्गदर्शक तत्वे जारी केल्याबाबत**

**(३) ३८९६० (०७-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बालकांवरील लैंगिक अत्याचाराला प्रतिबंध व गुन्ह्याच्या तपासासाठी तक्रार दाखल झाल्यानंतर २४ तासाच्या आत पोलिसांनी लैंगिक अत्याचार झालेल्या संबंधितांना महिला व बाल कल्याण समितीसमोर हजर करण्याच्या बंधनासाठी शासनाने नवीन मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नवीन मार्गदर्शक तत्त्वाच्या नियमावलीचे स्वरुप काय आहे, तसेच या मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) शासन परिपत्रक दि. ३ जानेवारी, २०२२ अन्वये पोस्को, २०१२ चे कलम १९ मधील पोट कलम (६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे २४ तासाच्या आत पिडीतेला बाल कल्याण समितीस व विशेष न्यायालयास अहवाल देणे बंधनकारक आहे.

(२) व (३)

i. पिडीत अल्पवयीन असेल तर तक्रार महिला पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नसेल अशा अधिकाऱ्याने घ्यावी.

ii. पोस्को २०१२ चे कलम १९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे २४ तासाच्या आत बाल कल्याण समिती व विशेष न्यायालयास अहवाल देणे बंधनकारक आहे.

iii. भा.दं.वि.स. कलम २२८-क नुसार विवक्षित अपराधांना बळी पडलेली व्यक्ती कोण ते उघड करण्यास मनाई आहे.

iv. बाल न्याय अधि. २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक पोलीस ठाणेत स्वतंत्र बाल कल्याण पोलीस अधिकारी नेमण्यात यावा.

v. मनोधैर्य योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यास पात्र पिडीतांचे प्रस्ताव जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे विहित वेळेत सादर करण्यात यावेत.

vi. पोस्को अधिनियम २०१२ व बाल न्याय अधि. २०१५ बाबतची पाठ्यक्रमात आवश्यक ती तरतुद करावी.

vii. सर्व घटक प्रमुख यांनी त्यांच्या घटकातील अधिकारी/अंमलदार यांचेसाठी सदर संदर्भात संवेदनशिलता वाढवण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन करावे, सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी गरजेनुसार महिला व बाल विकास विभाग, संबंधित अशासकीय संघटना, तज्ज्ञ आणि इतर यांची मदत घ्यावी.

viii. उपरोक्त परिपत्रकाबाबत कार्यवाही होण्याकरिता दि. १०.१.२०२२ अन्वये सर्व पोलीस घटकांना सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात देहविक्रीसाठी मुलींची फसवणूक होत असल्याबाबत**

**(४) ४०९४० (१२-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परदेशातून, इतर राज्यातून किंवा राज्याचाच इतर जिल्ह्यातून अल्पवयीन मुलींना व तरुणींना शहरात आणून देहविक्रीस ढकलण्यात येत असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सन २०२१ या कालावधीच्या माहे ऑगस्ट मध्ये वा त्यादरम्यान ४४ अल्पवयीन मुलींना देहविक्रीस ढकलण्याचा प्रयत्न झाल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवूनही अनैतिक मागणीची तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) राज्यात सन २०२० या वर्षीच्या राष्ट्रीय गुन्हे अहवालानुसार अनैतिक मानवी वाहतुकीच्या एकुण १८४ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ५१२ बळीत आहेत.(२) सन २०२० च्या राष्ट्रीय गुन्हे अहवालानुसार ४४ अल्पवयीन मुली तस्करीमध्ये बळीत आहेत.

(३) महाराष्ट्रात ३६ पोलीस घटकामध्ये ४५ अनैतिक मानवी वाहतूक कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. व्यापारी लैंगिक शोषणास बळी पडलेल्याची सुटका करण्यासाठी राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना करण्यात आलेली आहे. हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येते. अनैतिक मानवी वाहतूक संबंधात सर्व पोलीस घटकांना IJM व SAVE THE CHILD या NGO च्या मदतीने सन २०१९-२०२० मध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष यांच्या घरावर एस.टी. कर्मचारी आंदोलकांनी केलेला हल्ला**

**(५) ४४६५० (०१-११-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी.तील काही कर्मचाऱ्यांनी आंदोलन करुन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री.शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक (मुंबई) येथील घरावर हल्ला केल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारच्या आंदोलनाची शक्यता पूर्वीच असल्याचे गुप्तचर विभागाने ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र लिहून कळविले असूनही सदर सूचनेकडे दुर्लक्ष करुन जेवढा अतिरिक्त बंदोबस्त ठेवायला हवा तेवढा ठेवण्यात आलेला नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, याबाबत संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे. सदर प्रकरणी गांवदेवी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१३२/२०२२ कलम १४२, १४३, १४५, १४७, १४९, ३५३, ३३२, ३३३, ४४८, ४५२, १०७, १०९, १२०(ब),३३५,४४०,१०९ भादंवि सह कलम ७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट सह मपोका कलम ३७/१३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) दिनांक ०४.०४.२०२२ व दिनांक ०५.०४.२०२२ रोजी गावदेवी पोलीस ठाणेकडून अतिरिक्त पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. तसेच दिनांक ०८.०४.२०२२ रोजी देखील आवश्यक तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला होता.

(३) व (४) दि.०८.०४.२०२२ रोजी आंदोलनकर्ते हे सिल्वर ओक येथे येणार असल्याची गोपनीय माहिती तत्कालिन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांना दिल्यानंतरही त्यांनी त्याबाबत नियंत्रण कक्षास माहिती देवून अतिरिक्त मनुष्यबळ मागवून घेतले नाही, तसेच घटनास्थळी ते उशीरा व साध्या वेषात पोहचले म्हणून गावदेवी पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले होते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यात महिलांसह लहान मुलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(६) ४४७८६ (२७-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात व महिलांसह लहान मुलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास एका अहवालातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये दिवसागणिक वाढ होत असून सदर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कायद्यांची व जलद न्यायालयाची स्थापना करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे राष्ट्रीय गुन्हे नोंदणीनुसार महिलांसंबंधी गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र पाचव्या स्थानावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी महिलांमध्ये वाढणारी असुरक्षिततेची भावना तसेच महिला व लहान मुलांवरील अत्याचाराच्या प्रमाणावर आळा घालण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) i). क्राईम इन इंडिया अहवालानुसार सन २०२० ते माहे ऑक्टोबर २०२२ अखेर या कालावधीतील महाराष्ट्र राज्याची महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्ह्याची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| सन | दाखल गुन्हे |
|---|---|
| २०२० | ३१९५४ |
| २०२१ | ३९५२६ |
| २०२२ (माहे ऑक्टो २०२२) | ३६०१० |

ii) क्राईम इन इंडिया अहवालानुसार सन २०२० ते माहे ऑक्टोबर २०२२ अखेर या कालावधीतील महाराष्ट्र राज्याची बालकावरील अत्याचारासंबंधी दाखल गुन्ह्याची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| सन | दाखल गुन्हे |
|---|---|
| २०२० | १४३७१ |
| २०२१ | १७२३२ |
| २०२२ (माहे ऑक्टो २०२२) | १५३३० |

iii. धुळे जिल्ह्यात सन २०२० ते माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत महिला अत्याचार व बालकांवरील अत्याचाराबाबत दाखल गुन्ह्याची संख्या खालीलप्रमाणे आहे:-

| | महिलावरील अत्याचार | बालकांवरील अत्याचार |
|---|---|---|
| सन | दाखल गुन्हे | दाखल गुन्हे |
| २०२० | २३२ | ५५ |
| २०२१ | २०६ | ४९ |
| ऑक्टो. २०२२ अखेर | १९४ | ४२ |

धुळे जिल्ह्यात गुन्ह्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याची वस्तुस्थिती दिसून येत नाही.
(२) होय, विधी व न्याय विभागाच्या दि. ०४ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभाग यांचे क्राईम इन इंडिया २०२१ या प्रकाशित अहवालानुसार महिलांवरील अत्याचाराचे दाखल गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच क्राईम रेट नुसार महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये बाराव्या क्रमांकावर आहे.
(४) महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिला सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आले आहे. सर्व पोलीस घटकामध्ये पोलीस काका, पोलीस दिदी, निर्भया पथक, दामिनी पथक, भरोसा सेल कार्यरत आहेत. गंभीर गुन्ह्यांच्या बाबत मानक कार्यप्रणाली (SOP) जारी करणे, छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी महिला छेडछाड विरोधी पथके निर्माण करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उजनी (जि.सोलापूर) धरणाच्या पायथ्याशी पर्यटन केंद्र उभारण्याबाबत

**(७) ४५२५३ (१७-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाच्या पायथ्याशी पर्यटन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित केंद्राच्या आराखड्याचे सर्वसाधारण स्वरूप आणि केंद्र उभारणीस येणारा खर्च यांचा तपशील काय तसेच सदर प्रस्तावाच्या कार्यवाहीची सध्यस्थिती काय,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) धरण परिसर विकसित करण्यासाठी स्वागत केंद्र कमान, बगिचा, रंगित संगित कारंजे, लेसर शो, पर्यटक निवासस्थान, जलपर्यटन, अंतर्गत रस्ते व संरक्षक भिंत या बाबींचा समावेश असुन यासाठी उजनी प्रकल्पाच्या सुधारित तृतीय प्रकल्प अहवालामध्ये रु १०.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. उजनी धरण परिसर आराखडा तयार करण्याचे काम नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्रभवत नाही.

---

## राज्यात कर्ज वसूलीला कंटाळून होत असलेल्या आत्महत्येबाबत

**(८) ४६०२९ (२७-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सातत्याने कर्ज वसूलीला कंटाळून आत्महत्येचे प्रमाण गेल्या वर्षभरापासून वाढल्याचे निर्दशनात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्जाचे प्रमाण वाढल्याने कुरार गांव येथील महाराष्ट्र नगर मालाड मधील संदीप कोरगांवकर यांनी दिनांक ४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास कर्ज वसूलीला कंटाळून आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच खाजगी लोन ॲपमुळे अनेक कर्जदारांना वसूलीकरीता सातत्याने धमकी सत्र सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) कुरार गांव, मालाड, मुंबई येथील संदीप कोरगांवकर यांनी दिनांक ४ मे, २०२२ रोजी कर्ज वसुलीला कंटाळून आत्महत्या केली आहे.
(३) होय.
(४) उपरोक्त प्रकरणी कुरार पोलीस ठाणे येथे अपमृत्यू क्र.५६/२०२२ कलम १७४ फौदंप्रसं प्रमाणे नोंद करण्यात आला असून, फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार कुरार पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३८३/२०२२ भा.दं.वि.क. ४२०, ३०६, ५०० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम चे ६६ ड नुसार गुन्हा नोंद करण्यात आला. त्यानंतर सदर गुन्हा उत्तर प्रादेशिक विभाग, सायबर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१३/२०२२ गुन्हा वर्ग करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.

राज्यात अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास योग्य त्या प्रचलित कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई केली जाते. सर्व पोलीस ठाणे अंतर्गत वेळोवेळी पोलीस मित्र, मोहल्ला कमिटी, शांतता समिती यांच्या बैठका घेवून त्यांना ऑनलाईन फसवणूकीबाबतची माहिती देऊन सतर्क केले जाते. तसेच, सोशल मिडीयाद्वारे ऑनलाईन फसवणूकीपासून सावध रहाण्याच्या सुचना प्रसारित केल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाईंदर खाडीत व वैजापूर (जि.संभाजीनगर) येथे वाळूमाफियांकडून शासकीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याबाबत**

**(९) ४६२६१ (३१-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर खाडीत वाळूमाफियांच्या बेकायदेशीर कृतीस अटकाव करणाऱ्या पोलिसांना दिनांक १९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास तसेच वैजापूर (जि.संभाजीनगर) येथे श्री.राहुल गायकवाड या तहसीलदारास जेसीबीच्या सहाय्याने जीवे मारण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय कर्मचाऱ्यांवर होत असलेले हल्ले गंभीर असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) भाईंदर खाडीत वाळू माफियांकडून शासकीय कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या हल्ल्याची माहिती “निरंक” आहे. तसेच, श्री.राहुल गायकवाड, तहसीलदार, वैजापूर यांना जीवे मारण्याचा प्रयत्न वाळू माफियांकडून करण्यात आलेला आहे.

(२) शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याने उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन शिऊर येथे गु.र.नं.५९/२०२२ कलम ३०७, १४३, १४७, १४९, ३५३, ३७९, ५११ भा.दं.वि. सहकलम २१(१)(२)(३)(४)(५) गौण खनिज अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ११ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निम्ना तेरणा उपसा सिंचन योजना तात्काळ कार्यान्वित करणेबाबत.**

**(१०) ४६५८६ (११-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा उपसा सिंचन योजना (पंपगृह क्र. १ते ५) दिनांक १ एप्रिल, २००४ रोजी सिंचन व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात आली असून सदर योजनेची सिंचन क्षमता ६८९० हेक्टर असून उस्मानाबाद ५७०० हेक्टर, लोहारा ८३० हेक्टर, व औसा ३६० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनाद्वारे सिंचनासाठी ४७.३१ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित असुन त्यापैकी उस्मानाबाद शहरास पिण्यासाठी व औद्योगिक वसाहतीसाठी २.८३ द.ल.घ.मी. पाणी साठा आरक्षित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१३ पासून निम्न तेरणा प्रकल्पात पाणी उपलब्ध नसल्यामुळे तसेच दरम्यानच्या कालावधीत चोरीच्या घटना घडल्यामुळे सदर उपसा सिंचन योजना बंद असल्याने शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजना कार्यान्वित करण्याच्या अंदाजपत्रक मान्यतेची सद्य:स्थिती काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे

(४) सदरील योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणारे स्थापत्य कामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर असून,यांत्रिकी व विद्युत विभागाचे सविस्तर अंदाजपत्रक प्राप्त करुन घेवून एकत्रित अंदाजपत्रक तयार करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत सनदी लेखापाल व कंपनी सचिवाच्या मदतीने नवीन कंपन्या स्थापन करुन बेकायदा परदेशी नागरीकांच्या नावावर हस्तांतरीत केल्याबाबत

**(११) ४७८३६ (२८-१०-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सनदी लेखापाल व कंपनी सचिवाच्या मदतीने नवीन कंपन्या स्थापन करुन त्या कंपन्या बेकायदा परदेशी नागरीकांच्या नावावर हस्तांतरीत केल्या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी ५० हून अधिक जणांच्या विरोधात दाखल केलेल्या १३ गुन्ह्यात १५ परदेशी नागरीक असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी प्रथम भारतीय नागरिक असलेल्या आरोपींच्या नावे बनावट कंपनीची स्थापना करुन त्यानंतर निबंधक कार्यालयास न कळविता बेकायदा कंपनीची मालकी परदेशी नागरीकांच्या नावे केल्याचा गैरप्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मुंबईतील ३९ कंपन्यांतील सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांच्या मदतीने परदेशी नागरिकांच्या नावावर बेकायदा नवीन कंपन्यांचे हस्तांतर केल्याबाबत उप निबंधक व सहायक निबंधक, कंपनी निबंधक कार्यालय, मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरून माहे एप्रिल व मे, २०२२ रोजी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे ३९ कंपन्यांच्या सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांच्याविरूध्द भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४७७(अ), १२०(ब) सह कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ४४७ व ४४८ अन्वये ३९ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्यामध्ये एकूण १४० आरोपींपैकी ६५ परदेशी नागरीकांचा समावेश आहे.

नमूद ३९ कंपन्या या कंपनी निबंधक कार्यालय, मुंबई येथे नोंदणीकृत आहेत. कंपन्यांनी कर चुकविण्यासाठी व आर्थिक गैरव्यवहारासाठी बनावट कंपन्याची स्थापना केली किंवा कसे याबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्यामार्फत तपास करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जीएसटी भरपाई कालावधी संपुष्टात आल्याने राज्याचे होणारे आर्थिक नुकसान

**(१२) ४९९६५ (०९-०३-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जीसटी कायद्यामुळे राज्यांचे होणारे महसुली नुकसान भरून काढण्यासाठी केंद्र शासनाने लागू केलेल्या जीएसटी भरपाई कायद्याअंतर्गत असलेला भरपाई कालावधी माहे जुलै २०२२ मध्ये संपल्याचे निदर्शनास आले ,हे खरे आहे काय

(२) असल्यास ,सदरील भरपाई कालावधीत राज्याला मागील पाच वर्षात मिळालेल्या भरपाईचा तपशील काय आहे, तसेच भरपाई कालावधी संपल्याने राज्याला दरवर्षी जवळपास ३०००० कोटी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीएसटी भरपाई कालावधी वाढवून मिळावा यासाठी राज्यशासन केंद्र सरकारकडे जीएसटी परिषदेच्या माध्यमातून पाठपुरावा करत आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्याला भरपाई कालावधीत मागील पाच वर्षात रु.१०६८९८ कोटी एवढी नुकसानभरपाई मिळालेली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

आकडे - कोटीत

| वर्ष | एकूण मिळालेली नुकसान भरपाई |
|---|---|
| २०१७-१८ (जुलै-मार्च) | ० |
| २०१८-१९ | ८४६७ |
| २०१९-२० | १८८७६ |
| २०२०-२१ | ४७४७५ |
| २०२१-२२ | ३०००८ |
| २०२२-२३ (एप्रिल-जून) | २१०२ |
| एकूण | १०६८९८ |

१०१ व्या घटनादुरूस्तीनुसार, वस्तु व सेवाकरांच्या अंमलबजावणीच्या दरम्यान पहिल्या ५ वर्षातील संक्रमण अवस्थेमध्ये होणाऱ्या बदलाला संरक्षण देण्यासाठी नुकसान भरपाई देऊन राज्यांना हातभार लावण्याचे धोरण निश्चित करण्यात आले होते. या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यांनी या नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीमध्ये सक्षम होऊन महसुलाच्य बाबतीत स्वयंपुर्ण होणे अपेक्षित होते.

त्यामुळे भरपाई कालावधी संपल्याने राज्याला दरवर्षी जवळपास ३०००० कोटी रुपयाचे नुकसान होण्याची शक्यता आहे, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) लागू नाही.

---

**शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण जीवोन्नती अभियान (उमेद) चे देवगड तालुका अभियान व्यवस्थापकांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी मारहाण केल्याबाबत**

**(१३) ५००४० (२५-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामसंडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील गोगटे हॉलमध्ये १४ ऑगस्ट, २०२२ रोजी ''रानभाजी खाद्य व विक्री महोत्सव'' कार्यक्रमात शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण जीवोन्नती अभियान (उमेद) चे देवगड तालुका अभियान व्यवस्थापकांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी मारहाण केल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियान व्यवस्थापकांनी त्यांच्या जीवितास धोका असल्याची तक्रार करण्यासाठी देवगड पोलीस ठाण्यात गेले असता पोलीसांनी त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी वैभववाडी विधानसभेच्या लोकप्रतिनींधी जिल्हा पोलीस अधिक्षक यांची भेट घेऊन लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने यासर्व प्रकरणी चौकशी करुन शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या अधिकाऱ्यांना मारहाण करणाऱ्यांवर व त्यांची तक्रार नोंदवून न घेणाऱ्या पोलीसांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) नाही. महाराष्ट्र ग्रामीण जीवोन्नती अभियान (उमेद) चे देवगड तालुका अभियान व्यवस्थापक यांची स्थानिक लोकप्रतिनिधी हे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा करीत असताना त्यांचे कार्यकर्ते यांनी त्यांना मारहाण केलेली आहे.

(२) नाही. सदर प्रकरणी अर्जदार यांनी झालेल्या मारहाणीबाबत तक्रार लेखी लिहून आणतो म्हणून सांगितले. परंतू त्यांनतर ते परत आले नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशीची मागणी विधानसभेच्या लोकप्रतिनिधींनी केलेली नाही.
(४) फिर्यादीने दिलेल्या जबाबावरुन देवगड पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्हा क्र.२४६/२०२२ भा.दं.वि.क. ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये दाखल करण्यात आला आहे. उक्त प्रकरणी कोणताही पुरावा उपलब्ध झाला नसल्याने सदर गुन्ह्याची “सी” फायनल समरी मंजूर होणेसाठी न्यायालयात प्रलंबित आहे. तसेच, यामधील मारहाण करणारे लोकप्रतिनिधी यांचे कार्यकर्ते यांचेविरुध्द फौ.प्र.सं. कलम १०७ नुसार प्रतिबंधक कारवाई विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील महिलांवरील अत्याचाऱ्यांसंदर्भात वाढत्या घटनांना आळा घालण्याबाबत

**(१४) ५०१५८ (०९-०३-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न चिंताजनक असून माहे जाने. ते सप्टेंबर २०२२ या ९ महिन्यांत जिल्हयात महिलासंबंधीच्या २७४ गुन्हयांची नोंद झाली असून यामध्ये १२२ गुन्हे हे अतिप्रंसग व विनयभंग या प्रकारातील असल्याचे दि.२८ ऑक्टो.२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१ या मागील वर्षात माहे जानेवारी ते सप्टेंबर या ९ महिन्याच्या कालावधीत जिल्हयात महिलासंबंधी २४५ गुन्हयांची नोंद झाली असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय ,
(३) असल्यास, दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचाऱ्याचा वाढणाऱ्या घटना पाहतां, याबाबत शासनाने विशेष मोहिम आखून कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) रायगड जिल्हयात माहे जानेवारी ते सप्टेंबर २०२२ पर्यंत महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्हे एकूण ३०४ आहेत. यामध्ये बलात्काराचे -७६ व विनयभंगाचे-८५ गुन्हे दाखल आहेत.
(२) माहे जानेवारी ते सप्टेंबर २०२१ अखेर पर्यंत महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्हे २३३ आहेत.
(३) सर्व पोलीस घटकामध्ये महिला दक्षता समिती, महिला सहाय्यता कक्ष, पोलीस काका, पोलीस दिदी, निर्भया पथक, दामिनी पथक, भरोसा सेल कार्यरत आहेत. गंभीर गुन्ह्यांच्या बाबत मानक कार्यप्रणाली (SOP) जारी करणे, छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी महिला छेडछाड विरोधी पथके निर्माण करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्गावरील जिल्हयात ९ महिन्यात ४९ जणांचा मृत्युझाल्याबाबत

**(१५) ५०१५९ (२७-०१-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्ग मृत्युचा सापळा बनला असून जानेवारी ते सप्टेंबर,२०२२ या ९ महिन्यात रायगड जिल्हा पोलीस दूरक्षेत्राच्या हद्दीत येणाऱ्या महामार्गावरील भागात १४५ अपघात झाले असून त्यामध्ये ४९ जणांचा मृत्यु तर १६० जण जखमी झाले असल्याचे दि.३० ऑगस्ट,२०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच तेथील वडखळ ते इंदापूर याअंतर्गत महामार्गाची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असून त्याकडे शासनाचे होत असलेल्या दुर्लक्षपणाच्याविरोधात रायगड प्रेस क्लबच्यावतीने दि.९ नोव्हेंबर२०२२ रोजी कोलाड येथे मानवी साखळी आंदोलन करण्यांत येणार असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशी सुरक्षितेच्यादृष्टीने व होणारी वाहतूक कोंडी टाळण्याच्यादृष्टीने शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जानेवारी ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीत मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात १४५ अपघात झाले असून त्यामध्ये ४९ जणांचा मृत्यु तर ११८ गंभीर जखमी तर ४२ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) प्रवासी सुरक्षिततेच्या दृष्टीने व वाहतूक कोंडी टाळण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत.

१. वाहतूक कोंडी होणा-या ठिकाणी वाहतूक अंमलदार व होमगार्ड यांना नेमण्यात येत असून वाहतूक कोंडी होणार नाही यादृष्टीने दक्षता घेण्यात येते.

२. मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रं. ६६ वर महामार्ग पोलीसांमार्फत नियमित पेट्रोलिंग करण्यात येत असून अपघात घडल्यास अपघातग्रस्तांना तात्काळ मदत पोहचविण्यात येते.

३. मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याचे परिस्थितीबाबत एनएचएआय यांचेशी पत्रव्यवहार करण्यात येत असून रस्ता दुरूस्ती व देखभाल करणा-या संबंधीत कंपनीस वेग मर्यादा, डायव्हर्शन, हेल्पलाईन क्रं., इ. सुचनात्मक व मार्गदर्शनपर फलक लावणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

४. महामार्गांवरील घाट परिसरात तुटलेले संरक्षक कठडे / भिंती /गार्ड दुरुस्ती करणेबाबत तसेच रात्रीच्या वेळी प्रवासादरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने कॅट आईज / रोड स्टड्स बसविणे तसेच इतर आवश्यक उपाययोजना करणेबाबत संबंधीत आस्थापनांशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

५. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत शाळा, कॉलेज या ठिकाणी जाऊन सुरक्षित वाहतूक व वाहतूक नियमांबाबत वेळोवेळी कार्यशाळा घेऊन प्रबोधन करण्यात येते.

६. इंटरसेप्टर वाहनाद्वारे व ई-चलान डिव्हाईसद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कसूरदार वाहन चालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येते तसेच त्यांचे समुपदेशन करून वाहतूक नियमांचे पालन करणे तसेच अपघातग्रस्ताना मदत करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हयातील सडक/अर्जुनी तालुक्यातील मुरदोली येथील चुलबंद सिंचन प्रकल्पाला विकास कामांचा निधी मिळत नसल्याबाबत

**(१६) ५०४४१ (१८-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील सडक/ अर्जुनी तालुक्यातील मुरदोली येथील चुलबंद सिंचन प्रकल्पाला मागील अनेक काळापासून विकास कामासाठी निधी उपलब्ध झालेला नसल्याने कालव्याची दुरुस्ती मागील अनेक वर्षापासून झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुलबंद सिंचन प्रकल्पाला चालू वित्तीय वर्षात शासनाकडून किती निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन कालव्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) चुलबंद सिंचन प्रकल्पाला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कडून देखभाल दुरूस्ती अंतर्गत रू.१११.०० लक्ष निधी बिगर सिंचन प्रापणसूची अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये मंजूर करण्यात आलेला असून सदर निधी पुढील ३ वर्षांसाठी आहे. तसेच, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कालव्यांतील गाळ व गवत

काढून Resectioning च्या कामांकरिता सन २०१८-१९ मध्ये रू. ६८.६६ लक्ष, सन २०१९-२० मध्ये रू.३६.३१ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रू.४६.०९ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदपूर शहरातील (जि.लातूर) पोलीस ठाण्याची व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहतीतील इमारती जीर्ण झाल्याबाबत..

**(१७) ५०५८४ (१८-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर शहरातील (जि.लातूर) येथील सन १९८० मध्ये बांधण्यात आलेल्या पोलीस ठाण्याची व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहतीतील इमारती जीर्ण झाल्या असून तेथील काही इमारतीच्या भिंतीना भेगा पडल्याचे तसेच खिडक्या, दरवाजे तुटून शौचालयाची दुरावस्था झाल्यामुळे तेथील पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना जीव मुठीत धरुन राहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतींची डागडुजी व दुरुस्तीसाठी पोलिस प्रशासनाकडून, सार्वजनिक बांधकाम विभाग, तसेच पोलिस अधिक्षक कार्यालय, लातूर यांना लेखी स्वरुपात निवेदने देण्यात येऊनही अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त निवेदनाच्या अनुषंगान शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर इमारतींच्या डागडुजी व दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :**(१), (२), (३) व (४) होय

पोलीस स्टेशन अहमदपुरचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांचे मार्फत सुरु असून प्रगतिपथावर आहे.

पोलीस ठाणे येथे पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचेकरिता एकूण ४७ निवासस्थान बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, लातूर यांनी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महमंडळ मर्या. यांना पाठविण्यात आला आहे.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरविला आहे. त्यात पोलीस ठाणे अहमदपूर येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता ४७ निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून सुरु आहे.

---

## निभोरा (ता.यावला, जि.जळगांव) येथील शेतकऱ्याची “फोन पे “च्या माध्यमातून झालेली फसवणूक

**(१८) ५०९३१ (१७-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निभोरा (ता.यावला, जि.जळगांव) येथील श्री दिगंबर रामदास भोंगे यांनी वडिलोपार्जित शेतजमीन नावावर करणे व वारस लावण्यासाठी महसूल विभागातील एका कर्मचाऱ्याने आपल्या ओळखीच्या मध्यस्ती दलाला मार्फत अर्जदाराकडून “फोन पे “च्या माध्यमातून वेळोवेळी ५५ हजार रुपये घेऊन वारस नोंद न करता पुन्हा २ लाख ४७ हजार रूपयांची मागणी केल्याची तक्रार फैजपूर पोलीस ठाण्यात दि ४ /११ /२०२२ ला देण्यात आली असता पोलीसांनी गुन्हा नोंदविण्यास नकार दिला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :**(१) व (२) अशा आशयाची तक्रार फैजपूर पोलीस स्टेशन, जळगाव येथे प्राप्त झाली होती.

तथापि, त्यानुषंगाने चौकशी केली असता तक्रारदार यांनी वारस नोंदणीचे कामास विलंब होत असल्याने रागाच्या भरात तक्रार दिली असून त्यांना लोकसेवक यांच्याकडून कोणत्याही प्रकरणात पैसे मागणी केली नसल्याचे नमूद करुन माझी संबंधिताविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याने तक्रार अर्ज निकाली काढण्यात यावा असा जबाब दिला आहे. तसेच तक्रारदार हे लोकसेवक यांचे प्रत्यक्षात अगर अप्रत्यक्षात संपर्कात आलेले नाहीत व त्यांचेकडून लोकसेवकांनी पैसे मागीतल्याची घटना घडलेली नाही.

त्याअनुषंगाने, सदर तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## बीड जिल्ह्यातील श्री.भगीरथ बियाणी यांनी स्वत:वर गोळी झाडुन आत्महत्या केल्याबाबत

**(१९) ५१००१ (१७-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील एका राजकीय पक्षाचे शहराध्यक्ष असलेले श्री. भगीरथ बियाणी यांनी दि. ११.१०.२०२२ रोजी वा त्यासुमारास स्वत:वर गोळी झाडुन आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बीड शहरातील पोलीस स्टेशन येथे दि. १२.१०.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.भगीरथ बियाणी यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मोबाईल फोनद्वारे संपर्क केलेल्या व्यक्तींचे सीआडी तपासणी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, सीडीआर तपासणी त्यात काय निष्पन्न, त्याअनुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन पेठ, बीड येथे आ.मृ.नं. २४/२०२२ कलम १७४ सी.आर.पी.सी प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

मयत यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मोबाईलद्वारे संपर्क केलेल्या व्यक्तींची सी.डी.आर. तपासणी करण्यात आली असून मयत यांस किंवा मयत याने कॉल केलेल्या व्यक्तीची सखोल चौकशी करुन त्यांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात आले आहेत. मयत यांचा मोबाईल घटनास्थळी मिळालेला असून तो तपासाकामी जप्त करण्यात आला असून त्याची तपासणी करुन अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नौपाडा,ठाणे परिसरातील विद्यार्थीनीचा एका रिक्षा चालकाने विनयभंग केल्याबाबत

**(२०) ५१०३४ (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नौपाडा,ठाणे परिसरातील ११ वीत शिक्षण घेत असलेली विद्यार्थीनी महाविद्यालयात जाण्यासाठी घरातून निघाली असता मध्यवर्ती बाजारपेठेत भरदिवसा एका रिक्षा चालकाने विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थीनीने त्याला प्रतिकार करताच रिक्षाचालकाने तिला फरफटत नेल्याने ती गंभीर जखमी झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन आरोपी रिक्षाचालकास अटक करुन त्याच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) होय. प्रस्तुत प्रकरणी ठाणेनगर पोलीस स्टेशन जि. ठाणे येथे गु र नं १८४/२०२२ भादंवि ३५४, ३५४(अ), ३३६, २७९ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दिनांक १४.१०.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) विद्यार्थीनीने आरोपीस प्रतिकार करताच रिक्षा चालकाने तिला फरफटत नेल्याने किरकोळ दुखापत झालेली आहे.
(३) सदर गुन्ह्यातील आरोपीस दि. १५.१०.२०२२ रोजी अटक करण्यात आले असुन दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सायबर सेल अधिक सक्षम आणि अदयावत करण्याबाबत..**

**(२१) ५११०२ (१७-०१-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), अॅड.राहूल कुल (दौंड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, असून, मुंबई पोलिसांच्या आकडेवारीनुसार माहे जानेवारी ते जुलै, २०२२ दरम्यान फक्त मुंबई शहरात २९५३ सायबर गुन्ह्यांची नोंद झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सायबर हॅकरकडून अनेक सायबर स्कॅम सुरु असुन मोबाईलवर थकीत वीजबील भरा अथवा रजिस्टेशन चार्ज भरा नाही तर तुमचा वीजपुरवठा रात्री खंडित केला जाईल असे मेसेज पाठवून नाशिक येथील सेवानिवृत्त अधिकारी रामदास शिवराम अमृतकर वडाळा शिवार यांची हॅकरने फसवणूक केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सायबर गुन्हेगारीला आळा घालल्यासाठी सायबर पोलिस दल अधिक कार्यक्षम करुन सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) नाशिक पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस स्टेशन येथे सेवानिवृत्त अधिकारी श्री. रामदास शिवराम अमृतकर यांनी फसवणूक झाल्याबाबत तक्रार अर्ज सादर केला होता.त्याअर्जाची तात्काळ दखल घेउन त्यांच्या खात्यातून डेबिट झालेली ३,९८,५६१/- रक्कम बाबत संबंधित बँकेशी पाठपुरावा करून परत मिळविण्यात आली आहे.तथापि, त्यांनी गुन्हा दाखल करण्यास नकार दिल्याने गुन्हा दाखल केलेला नाही.
(४) विषयांकित प्रकरणी खालील उपाययोजना शासनामार्फत करण्यात येत आहे:-
अ) मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत.
ब) मुंबई पोलीस दलामध्ये महत्वाच्या तसेच संवेदनशील गुन्हयांचा तपास खाजगी सायबर तज्ञांच्या मदतीने केला जातो.
क) सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्हयाचा तपास करण्याबाबतचे प्रशिक्षण देऊन अपडेट व अपग्रेट केले जाते तसेच त्यांना सायबर फॉरेन्सिक टूल्स हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते.
ड) संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी सोशल मिडियाद्वारे देखील सर्वसामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती शहरातील पोलिसांच्या निवासस्थानांच्या नवीन वसाहती उभारण्याबाबत**

**(२२) ५१३१५ (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरातील पोलिसांच्या निवासस्थानासाठी नवीन वसाहती उभारण्याबाबत तत्कालीन मा. गृहमंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्ताव मागविण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या प्रस्तावांवर मंजूरी दिली आहे काय,
(३) असल्यास, अमरावती शहरातील पोलीसांच्या निवासाच्या प्रश्नांसाठी उक्त प्रस्तावानूसार निधी उपलब्ध करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :**(१) पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील ६५० शासकीय निवासस्थाने बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून, पोलीस आयुक्त, अमरावती शहर कडुन पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.
(२), (३) व (४)
राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून शासन पत्र दि.०७.०२.२०२३ अन्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. सदर यादीमध्ये पोलीस आयुक्त, अमरावती शहर येथील पोलीस अधिकारी व अमंलदारयांचेकरिता ६५० निवासस्थान बांधकामाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून सुरु आहे.

---

**राज्यात कोरोनानंतर अल्पवयीन मुलांवरील हिंसेच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत**

**(२३) ५१३५९ (१७-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनानंतर अल्पवयीन मुलांवरील हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दि ३ सप्टेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात हिंसाचाराच्या १७, २६१ घटना घडल्या हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मुलावरी होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे,
(४) नसल्यास विलंबाचे कारण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :**१) होय. सदरची माहिती क्राईम इन इंडिया २०२० व २०२१ अहवालानुसार अल्पवयीन मुलांवरील हिंसाचाराच्या दाखल गुन्ह्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| सन | २०२० | २०२१ |
|---|---|---|
| दाखल गुन्हे | १४३७१ | १७२६१ |

(२) होय. सन २०२१ मध्ये राज्यात बालकांवरील अत्याचाराच्या संदर्भात १७२६१ गुन्हे दाखल आहेत.
(३) बालकावरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये विशेष पोलीस दल स्थापन करण्यात आले आहे. महिला व बालकांवरील अत्याचारांची प्रकरणे निकाली काढण्याकरिता राज्यात विशेष न्यायालये व जलदगती न्यायालये स्थापन केले आहेत. तसेच सर्व ४९ पोलीस घटकामध्ये विशेष बाल पोलीस पथके कार्यरत आहेत. हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी राज्यात ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येत आहे. अल्पवयीन मुलीवर होणारा अत्याचार रोखण्याकरिता पोलीस घटकामध्ये पोलीस काका, पोलीस दिदी, निर्भया पथक, दामिनी पथक, भरोसा सेल कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

### शासकीय कामासाठी लाच घेणा-या अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द बहुतांशी कारवाई होत नसल्याबाबत

**(२४) ५१५३७ (१७-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय कामासाठी लाच घेणा-या अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द बहुतांशी कारवाई होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असुन या लाचखोर कर्मचा-यापैकी सर्वाधिक संख्या नागपूर विभागात आहेत हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, विविध विभागातील ६४ अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द कारवाई झाली असुन लाचखोरांना बडतर्फे करण्याची शिफारसही संबंधित शासनाच्या विभागांना करण्यात आली आहे परंतु अद्यापही याबाबत कोणतेही आवश्यक कार्यवाही शासन करीत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दिनांक ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१०/२०२२ या कालावधीत एकुण ६१३ सापळा कारवायां करण्यात आल्या आहेत. सदर कारवायांमध्ये लाप्रवि, नागपूर परिक्षेत्राने ६७ सापळा कारवाया केलेल्या आहेत.

(२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल झाल्यावर आरोपी लोकसेवकाचे निलंबन व बडतर्फे करण्याचे अधिकार हे आरोपी लोकसेवकाच्या संबंधित सक्षम प्राधिकारी यांना असतात. मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील आयोजित आढावा बैठकीमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत दोषी आढळलेल्या लोकसेवकांना सेवेतून निलंबित करण्याबाबतचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**हिरडपाडा येथील लेंडी लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम विहित पूर्ण करण्याबाबत**

**(२५) ५१८५५ (२२-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिरडपाडा (ता.जव्हार जि.पालघर) येथील लेंडी लघु पाटबंधारे प्रकल्पामध्ये पाणी टंचाईच्या वेळी ५ गावांतील ५५० हेक्टर आदिवासी क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी व प्रकल्पाच्या उभारणीसाठी सन २००८-२००९ च्या दरसूचीवर आधारित सन २०१५ मध्ये ७५.९० कोटी रक्कमेची सुधारित मान्यता प्रदान करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांनी दिलेल्या विविध अभिप्रायानुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित १८७.०४ कोटी किंमतीची दुसरी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पाचे काम २७ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने सदरहू प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे तसेच सदरहू प्रकल्पाचे काम निर्धारित २७ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२३) :** (१)होय.
(२) होय.
(३) लेंडी लघु पाटबंधारे योजनेसाठी दिनांक ०१/०९/२०२२ च्या शासन निर्णयानुसार सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारीत रु. १८७.०४ कोटी किंमतीची व्दितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता अटीं व शर्तीसह प्राप्त झाली आहे. या शासन निर्णयातील अटींनुसार सदर प्रकल्पाचे काम प्रशासकिय मान्यतेपासून पुढील २७ महिन्यात अर्थात डिसेंबर-२०२४ अखेर पुर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णयातील अट क्र.४ नुसार वनजमीन प्रस्तावास दि. २८ मार्च, २००८ च्या पत्रान्वये दिलेल्या तत्वतः मान्यतेच्या अटींची पूर्तता ५ वर्षाच्या कालावधीत न झाल्याने सदर तत्वतः मान्यता रद्द झाली असून त्यामुळे केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडून नव्याने मान्यता घेतल्याखेरीज प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी आर्थिक तरतूद करता येणार नाही, म्हणून सुमारे ३०.६१ हे.वनजमिनीसाठी सुधारीत वनजमिन प्रस्ताव तयार करून विभागाच्या दि. २४/११/२०२२ अन्वये उपवनसंरक्षक जव्हार वन विभाग,जव्हार यांना सादर केला आहे.तसेच सुमारे ८० % वनजमिनीचे वनविभागाकडून प्रमाणिकरण झाले असून वन प्रस्तावास ऑक्टोबर - २०२३ पर्यंत मान्यता प्राप्त करणेचे नियोजन आहे. तद्नंतर प्रकल्पाच्या उर्वरीत कामाचे पूर्णत्वाचे नियोजन करणेत आलेले असून निधी उपलब्धतेनुसार भुसंपादन व पुनर्वसनाची कामे तसेच कालव्याची कामे पुर्ण करणे व सन-२०२४ मध्ये घळभरणी व कालव्याच्या बंदिस्त नलिकेची कामे पूर्ण करून प्रकल्प डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करणेचे सद्यस्थितीत नियोजन करणेत आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील नामांकित बांधकाम व्यावसायिक यांनी घरातील जिममध्ये पंख्याला गळफास घेऊन केलेली आत्महत्या**

**(२६) ५२४९५ (१७-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील नामांकित बांधकाम व्यावसायिक यांनी घरातील जिममध्ये पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बाब दि. २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकाम व्यावसायिक यांनी आत्महत्यापूर्वी दोन पानांची सुसाइड नोट लिहिली असून त्यात चार व्यावसायिक यांनी कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणुक केल्यामुळे आत्महत्या करीत असल्याचे नमूद केल्याची माहिती समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) औरंगाबाद शहरातील नामांकित व्यावसायिक यांनी बँकेतून ३० कोटी कर्ज घेऊन देण्यासाठी आरोपीला सुमारे रुपये ६८ लाख इतकी रक्कम दिली. परंतू सदर रक्कम परत न मिळाल्याने व आर्थिक फसवणुक झाल्याने आत्महत्या करीत असल्याचे व या मृत्युला ते जबाबदार असतील अशी सुसाईड नोट त्यांनी लिहिली होती. सदर प्रकरणी जवाहरनगर पो.स्टे.येथे गुरनं २४५/२०२२ कलम ३०६ भादंवि वाढीव कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्त प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपी याने सदर पैशातून विकत घेतलेली गाडी जप्त करण्यात आली आहे. आरोपी सध्या न्यायालयीत कोठडीत असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील कन्हान नदीवरील कोच्छी बँरेज प्रकल्पातील बाधीत गावांचे पुनवर्सनाबाबत**

**(२७) ५२५३९ (२०-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्हान (ता.सावनेर, जि.नागपूर) नदीवरील कोच्छी बँरेज प्रकल्पास २००७-०८ मध्ये सूप्रमा देण्यात आले असून आजतागात प्रकल्पातील बाधीत गावांचे पुनवर्सन अद्यापही पुर्ण झाले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकल्पाअंतर्गत येत असलेल्या बाधीत गावांतील प्रकल्पग्रस्तांना गावठाण्याच्या निवाडयाप्रमाणे सानुग्राह मिळत नाही हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकल्पाअंतर्गत असलेल्या बाधीत गावाचे पुनवर्सन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०२३) :** (१) होय,अंशत: खरे आहे,
कन्हान नदी कोच्छी बँरेज प्रकल्पांतर्गत एकूण ३ बाधित गावांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी ,
अ) बाधित गावठाण मौजा- कोच्छी चे पुनर्वसीत गावठाण कोच्छी बावनगाव येथील नागरी सुविधेची कामे पूर्ण झालेली असून जिल्हास्तरीय समितीने सुचविलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून जिल्हा परिषद, नागपुर यांचे कडे सन २०२० ला हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.
ब) बाधीत गावठाण मौजा-रायवाडी चे पुनर्वसीत गावठाण मौजा-बडेगाव येथील नागरी सुविधेची कामे ९० टक्के पुर्ण झाली असुन प्रगतीपथावर आहे.
क) बाधीत गावठाण मौजा-ढालगाव खैरी चे पुनर्वसीत गावठाण पारडी (रिठी) येथील घरांचे मुल्यांकन तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. सदर कामे जून २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) प्रकल्पांतर्गत बाधीत गावठाण मौजा- कोच्छी येथील खाजगी जमीनीवरील घरांना गावठाणातील निवाडयाप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव नियामक मंडळाचे बैठकीमध्ये प्रस्ताव मंजुरीकरीता सादर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. शासन नियमाप्रमाणे पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर आणि तारापूर औद्योगिक वसाहतीमधील (जि.पालघर) मुख्य रस्त्यांवर अवजड वाहनांचे बेकायदा पार्किंग होत असल्याबाबत**

**(२८) ५२९४३ (१९-०१-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर आणि तारापूर औद्योगिक वसाहतीमधील (जि.पालघर) मुख्य रस्त्यांवर अवजड वाहने बेकायदेशीररित्या पार्किंग होत असल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीररित्या पार्किंग केलेल्या भागात दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकास जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदा पार्किगमुळे आरटीओ, वाहतूक पोलिसांसोबत एमआयडीसी व स्थानिक ग्रामपंचायतीकडूनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदा पार्किंगला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पालघर जिल्ह्यात सप्टेंबर, २०२२ मध्ये नव्याने वाहतूक शाखा स्थापन करण्यात आल्यानंतर अवजड वाहनांमुळे होणाऱ्या वाहतूकीच्या समस्या व बेकायदेशीर पार्किंगबाबत अध्यक्ष, तारापूर औद्योगिक संघटना यांचेशी पत्रव्यवहार करून बैठक घेण्यात आली आहे. सदर बैठकीत रस्त्यांवर दुतर्फा वाहने न लावण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
तसेच ग्रामपंचायत बोईसर यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला असून सदर पत्राच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीमार्फत ग्रामसभा घेऊन वाहतूक कोंडीसंदर्भात मार्गदर्शन व सूचना करण्यात आलेल्या आहेत.
(४) बेकायदा पार्किंगला आळा घालण्याकरीता अवैध पार्किंग व वाहतूक कोंडी करणाऱ्या वाहन चालकांवर बोईसर पोलीस ठाणे येथे सन २०२२ मध्ये ८७ व सन जानेवारी २०२३ पर्यंत १० गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सन २०२२ मध्ये नो पार्किंग करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायदा कलम १७७अ अन्वये ६ केसेस दाखल करण्यात आले आहेत.
तसेच बोईसर आणि औद्योगिक वसाहतीत येणाऱ्या जड-अवजड वाहनांकरीता व रेल्वे स्टेशन परिसरातील रस्त्यांवर पार्किंग होणाऱ्या वाहनांसाठी पार्किंगसाठी प्लॉट उपलब्ध करून देणेबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला असून वाहने मुख्य रस्त्यावर न लावणेबाबत वारंवार जनजागृती करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ३५३ व ३५३ अ कायद्याचा सरकारी कर्मचारी/अधिकारी वर्गाकडून दुरुपयोग होत असल्याबाबत**

**(२९) ५३३०१ (२३-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ३५३ व ३५३ अ कायद्याचा सरकारी कर्मचारी/अधिकारी वर्गाकडून दुरुपयोग होत असल्याचे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कायद्याचा दुरुपयोग होत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तसेच लोकप्रतिनिधींना सदर कायद्याची अधिकारी वर्गाकडून धमकी दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींना कर्तव्य बजावताना सदर कायद्यामध्ये अडचण निर्माण होत असल्यामुळे सदर कायदा रद्द करावा किंवा त्यात दुरुस्ती करावी अशी मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर कायदा रद्द किंवा त्यात दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही. राज्यामध्ये ३५३ व ३५३-अ भादंवि कायद्याचा सरकारी कर्मचारी/अधिकारी वर्गाकडून दुरुपयोग होत असल्याबाबत ऑक्टोबर, २०२२ वा त्या सुमारास कोणतीही तक्रार व गुन्हा नोंद नाही
(२) राज्यामध्ये अधिकारी व अंमलदार यांच्याकडून सर्व सामान्य नागरिकांना तसेच लोकप्रतिनिधींना सदर कायद्याची धमकी दिली जात असल्याबाबत कोणतीही तक्रार अथवा अर्ज प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगाखेड (जि.परभणी) येथे मंडळ अधिकारी तसेच तलाठी (मालेवाडी) यांना लाच घेताना अटक केल्याबाबत**

**(३०) ५३७५१ (२४-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत श्री.संजय लक्ष्मणराव काकडे, मंडळ अधिकारी तसेच श्री.रमेश दत्ताराम भराड,तलाठी (मालेवाडी) यांना दहा हजार रूपयांची लाच घेताना अटक करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.संजय लक्ष्मणराव काकडे, मंडळ अधिकारी यांचेवर सन २०१७ मध्ये तर श्री.रमेश दत्ताराम भराड,तलाठी (मालेवाडी) यांचेवर सन २०१५ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली होती व त्या प्रकरणी या दोघांवर गुन्हे नोंद करून प्रशासकीय स्तरावर कारवाई करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.संजय लक्ष्मणराव काकडे, मंडळ अधिकारी यांचेवर सन २०१७ मध्ये तर श्री.रमेश दत्ताराम भराड,तलाठी (मालेवाडी) यांचेवर सन २०१५ मध्ये कोणत्या प्रकरणांमध्ये लाचलुचपत विभागाने कारवाई केली होती त्याचा तपशील काय आहे तसेच या दोघांवर या प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल असताना त्यांना पुन्हा शासकीय सेवेत केव्हा घेण्यात आले व त्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच श्री.संजय काकडे व श्री.रमेश भराड यांचेवर माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये गुन्हे दाखल झाल्यानंतर त्यांच्या घराची व कार्यालयाची तपासणी केली आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,
(५) असल्यास, वारंवार लाच घेण्याऱ्या श्री.संजय काकडे व श्री.रमेश भराड यांना तातडीने शासकीय सेवेतून बडतर्फ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) I. आलोसे क्र.१ मंडळ अधिकारी यांचेवर सन २०१७ मध्ये तर आलोसे क्र.२ तलाठी, मालेवाडी, यांचेवर सन २०१५ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली होती. त्यावेळी दोन्ही आरोपी लोकसेवकावर गुन्हा नोंद झाल्याने प्रशासकीय स्तरावर दोन्ही आरोपीसेवकांना अनुक्रमे दिनांक २४.०१.२०१७ व दिनांक २४.०४.२०१५ रोजी शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते.
II. दि.१८/०४/२०१५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडुन आलोसे यांचेवर तक्रारदार यांना त्यांच्या शेतातील रेशीम तुतीच्या झाडाचे पिकांचे नुकसान झाल्याबाबत प्रमाणपत्र, सातबारा व होल्डींग देण्यासाठी तक्रारदार यांचेकडुन ५००/- रूपयांची लाच घेताना कारवाई करण्यात आली होती. त्यांचेविरूध्द कोतवाली पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम (सुधारणा २०१८) १९८८ चे कलम ७, १३(१)(ड), १३(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

III. दि.१०/०१/२०१७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी संबंधित आलोसे, मंडळ अधिकारी यांचेवर तक्रारदार यांच्या वडीलोपार्जीत शेत गट क्र. २५७ व २६१ ची फोड करून फेर मंजूर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून रु.४०००/- रकमेची लाच स्विकारताना कारवाई करण्यात आली होती. त्या त्यांचेविरूध्द सेलू पोलीस ठाणे येथे दिनांक ११.०१.२०१७ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम (सुधारणा २०१८) १९८८ चे कलम ७, १३(१)(ड), १३(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.
IV. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्या दिनांक ०५.०२.२०१९ च्या आदेशान्वये आलोसे क्र.१ मंडळ अधिकारी यांना त्यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांच्याविरुद्ध मा. न्यायालयाचे व विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधीन राहून त्यांना शासकीय सेवेत पुन:स्थापित करण्यात आले होते. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, गंगाखेड यांच्या दिनांक ०३.१०.२०१६ च्या आदेशान्वये आलोसे क्र.२ तलाठी, मालेवाडी, यांना त्यांचे निलंबन संपुष्टात करुन त्यांना शासकीय सेवेत पुन:स्थापित करण्यात आले होते.
(४) सदर प्रकरणी संबंधित आलोसे यांच्यावर ऑक्टोबर २०२२ मध्ये गुन्हे दाखल झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयाची व घराची घरझडती घेण्यात आलेली आहे. त्यामध्ये आलोसे क्र.१, मंडळ अधिकारी यांच्या सेलु येथील घरझडतीमध्ये एकुण रु.६,२९,५७५/- किंमतीचे घरसंसार उपयोगी व घराचे सुशोभीकरण साहीत्य आढळुन आले आहे. आलोसे क्र.२ तलाठी (मालेवाडी) यांच्या परभणी येथील घरझडतीमध्ये एकुण रु.२,९६,९२८/- किंमतीचे घरसंसार उपयोगी साहित्य आढळुन आलेले आहे.
(५) I. सदर प्रकरणी दोन्ही आलोसे यांच्यावर गुन्हा दाखल झालेले असून सदर गुन्हाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांच्याकडून सुरु आहे.
II. तसेच संबंधित दोन्ही आरोपी लोकसेवकांना दिनांक १८.१०.२०२२ रोजी पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

## भोरे, वेल्हे, मुळशी, (जि. पुणे) तालुक्यातील विवीध पोलीस स्टेशनसाठी इमारत बांधकाम, अधिकारी-कर्मचारी निवासस्थान इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन निधी मंजूर करण्याबाबत

**(३१) ५३९६८ (१८-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोरे, वेल्हे, मुळशी (जि.पुणे ) तालुक्यातील दुर्गम भागातील विवीध पोलिस स्टेशनसाठी इमारत बांधकाम, अधिकारी-कर्मचारी निवासस्थान इमारतीसाठी जागा उपल्बध करुन निधी मंजूरसाठी बैठक आयोजीत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दि. १८/८/२०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :**(१), (२) व (३) होय,
मा. विधानसभा सदस्य यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पौंड पोलीस स्टेशन (ता.मुळशी, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशन ता. भोर, जि. पुणे , वेल्हे पोलीस स्टेशन (ता.वेल्हे, जि. पुणे) येथील पोलीस स्टेशन साठी इमारत बांधकाम, अधिकारी व कर्मचारी निवासस्थान व जागा उपलब्धकरुन निधी मंजूर होणेबाबतच्या विषयी पोलीस स्टेशन निहाय माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे;
(I) पौंड पोलीस स्टेशन- प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्या निवासस्थानांकरीता मौजे दारवली येथील जमीन पोलीस विभागास देण्यासाठी प्रस्ताव महसूल व वन विभागास प्रस्ताव सादर केला आहे.
(II) भोर पोलीस स्टेशन-राज्यातील पोलीस स्टेशनच्या इमारती बांधकामाच्या प्राधान्यक्रमास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये भोर पोलीस स्टेशनच्या इमारतीचा समावेश आहे. याबाबत पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.

(III) राजगड पोलीस स्टेशन- राजगड पोलीस स्टेशनच्या इमारतीकरीता पोलीस विभागाच्या नावे जागा उपलब्ध नाही. जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रशासकीय इमारतीकरीता व निवासस्थानाकरीता भोरयेथील पोलीस विभागाच्या नावे असलेली गट क्र. १७५ / ब मधील ३ हेक्टर ६७ आर पैकी १ हेक्टर २० आर जागा महसूल विभागास हस्तांतरीत होऊन त्या बदल्यात राजगड पोलीस स्टेशनच्या नवीन प्रशासकीय इमारतकरीता व शासकीय निवासस्थानाकरीता राज्य परिवहन महामंडळाची राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ लगत चेलाडी येथील १ हेक्टर पर्यायी जागा मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. तथापि राज्य परिवहन महामंडळाकडून सहमती न दर्शविल्याने मौजे कामथडी येथील जमीन गट नं.१०४ मधील ३१ गुंठे जागा मिळणेचा प्रस्ताव सादर केला आहे.
(IV) वेल्हे पोलीस स्टेशन- जिल्हा नियोजन समितीकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत वेल्हे पोलीस स्टेशनच्या प्रशासकीय इमारत बांधकामासाठी अंदाजीत रु.३.९९ लक्ष खर्चास दिलेल्या मान्यतेनुसार पोलीस ठाण्याच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु आहे.

---

## मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर शिवसंग्रमाचे दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या झालेल्या अपघाती मृत्यूप्रकरणी चौकशीबाबत

**(३२) ५४०७८ (२७-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर शिवसंग्रमाचे दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी वाहनचालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सीआयडी चौकशी करुन निष्कर्ष अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी दोषी असलेल्यावर चौकशीअंती कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
रसायनी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२१८/२०२२ भा.द.वि. कलम ३०४(II), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे वाहन चालक याचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी अपर पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी चौकशी केली आहे.
चौकशींअंती रसायनी पोलीस ठाणे येथे वाहन चालक याचेवर गु.र.नं.२१८/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर, जि.रायगड यांचे न्यायालयात दि.१०.०१.२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणावळा व खंडाळा शहर (ता.मावळ) येथे वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक शाखा सुरु करण्याबाबत

**(३३) ५४११० (१९-०१-२०२३). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणावळा व खंडाळा (ता.मावळ) शहरात दर शनिवारी व रविवारी तसेच सलग सुट्टीच्या कालावधीत पर्यटनाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने काही किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने पर्यटकांचा अर्धा दिवस हा केवळ वाहतूक कोंडीतून मार्ग काढावा लागत असल्याने पर्यटकांना तसेच स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत स्थानिक नागरिक व पर्यटक मागणी करत असतानाही पोलीस प्रशासन व नगरपरिषद दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोणावळा शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी येथे वाहतूक शाखा सुरू करण्याची मागणी स्थानिकांकडून काही वर्षांपासून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार लोणावळा व खंडाळा शहरात होणारी वाहतूकी कोंडी सोडविण्यासह लोणावळा येथे वाहतूक शाखा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शनिवारी व रविवारी तसेच सलग सुट्टीच्या कालावधीत पर्यटकांची गर्दी होत असल्याने लोणावळा शहरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त नेमण्यात येतो, तसेच लोणावळा नगर परिषदेकडून १० ट्राफिक वॉर्डन पुरविण्यात आलेले असून त्यांचा वापर करण्यात येतो. तसेच लोणावळा शहरात एकेरी वाहतूक सुरू करून वाहतूक कोंडी सोडविली जाते.
(३) व (४) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यालयात लोणावळा शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक शाखा सुरू करण्याची मागणी स्थानिकांकडून केल्याचे निवेदन प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरगाव अंजनपूर (ता. जि. लातूर) येथील निम्न पातळी बंधारा द्वार दुरूस्ती बाबत.

**(३४) ५४२५५ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगाव अंजनपूर (ता. जि. लातूर) येथील बॅरेजच्या स्वयंचलीत द्वारांच्या आवश्यक दुरुस्तीकरीता १० x ४ मी. आकारमान व सर्व द्वारांकरीता Power Packs, ६२.५ KVA अतिरीक्त जनरेटर, ५ ते १० वर्षे कालावधीकरीता देखभाल-दुरुस्ती खर्च, द्वार परिचालन खर्च अंतर्भुत करुन रु.४.५७ कोटी किंमतीचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग.क्र. १ यांना प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अंदाजपत्रक तपासणी व आवश्यक उपाययोजना तसेच यापुर्वीचे द्वारे नादुरुस्त होण्याच्या कारणांचा सविस्तर अहवाल उपलब्ध करुन देणेबाबत संबंधीत यांत्रिकी विभागास कळवण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यकारी अभियंता मुख्य द्वार उभारणी पथक क्र. ४, औरंगाबाद. यांचेशी कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग.क्र.१, लातूर यांची झालेल्या चर्चेनुसार अंदाजपत्रकातील सदरील द्वार दुरुस्ती कामाची रेखाचित्रे अपूर्ण असल्याने संबंधीत यांत्रिकी विभागास संपर्क साधून आवश्यक रेखाचित्रे उपलब्ध करुन द्यावीत व त्यांचे सुचनेनुसार अंदाजपत्रकातील तरतुदी अंतिम करून तातडीने कार्यवाही करण्याबाबत The Director, Godbole Gates Pvt. Ltd, Nagpur यांना कळवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बॅरेजच्या स्वयंचलीत द्वारांच्या दुरुस्तीचे आवश्यक रेखाचित्रे उपलब्ध करून देऊन अंदाजपत्रकातील तरतुदी तातडीने अंतिम करून देण्याबाबत संबंधिताना आदेशित करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री व प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांच्याकडे दि. २०/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून स्वयंचलीत द्वारांच्या दुरुस्तीचे आवश्यक रेखाचित्रे व अंदाजपत्रकातील तरतुदी अंतिम करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
अंदाजपत्रक गोडबोले गेट्स प्रा.लि.नागपूर या गोडबोले गेट्स पेटंटेड कंपनीकडून ई-मेलद्वारे दि.२३.०९.२०२२ रोजी क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय,हे खरे आहे.
कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.१ लातूर यांचे दि.१५.१०.२०२२ अन्वये गोडबोले गेट्स प्रा.लि.,नागपूर कंपनीस कळविण्यात आले आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक ,औरंगाबाद यांनी निश्चित कोणत्या पध्दतीने दुरुस्तीचे काम करावे याबाबत मुख्य अभियंता (यांत्रिकी) ,नाशिक यांचेकडून दि.१९.१२.२०२२ च्या पत्रान्वये अभिप्राय मागविले आहेत. त्यानुसार बोरगांव अंजनपूर येथील स्वयंचलित गोडबोले द्वारांऐवजी मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभी उचलद्वारे बसविणे योग्य राहील, जेणेकरुन सदर बंधा-याची भविष्यातील उपयुक्तता टिकून राहील असे अभिप्राय दि.०९.०२.२०२३ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता (यांत्रिकी),नाशिक यांनी दिले असून, त्यानुषंगाने विशेष दुरुस्तीअंतर्गत गोडबोले द्वारांऐवजी उभे उचल द्वारांचे अंदाजपत्रक प्रस्तावित करण्याबाबत अधीक्षक अभियंता व प्रशासक,लातूर यांना दि.२०.०२.२०२३ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक (लाक्षेवि),औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकवासला धरण ते फुरसुंगी – लोणीकाळभोर (जि. पुणे) पर्यंत भूमिगत कालव्याच्या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत

**(३५) ५४३४२ (२०-०१-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला धरण ते फुरसुंगी - लोणीकाळभोर (जि. पुणे) दरम्यान असलेला २८ किमीचा कालवा भूमिगत करण्यात येत असून यासाठी सुमारे ८०० ते १००० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, हा भूमिगत कालवा झाल्यास, पुणे शहरात सुमारे १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची जागा रस्ते, पुल, मेट्रो तसेच व्यावसायिक प्रकल्पासाठी उपलब्ध होणार आहे. या भूमिगत कालव्यामुळे पाण्याची होणारी नासाडी तसेच बाष्पीभवन थांबून खडकवासला धरणाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील जनतेला तसेच शेतीच्या पाण्याला काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूमिगत कालवा करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०२३) :** (१) खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान २७ किमी लांबीचा बोगदा (भुमिगत कालवा) प्रस्तावित असून त्यासाठी अंदाजे रू.२००० कोटी खर्च अपेक्षित आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
सन २०२२-२३ च्या रेडिरेकनर दरानुसार नवीन मुठा उजवा कालव्याच्या किमी ० ते ३४ साठी संपादित केलेल्या २९७ हे. क्षेत्राची किंमत अंदाजे रू.३७८९.६८ कोटी इतकी येत आहे.
खडकवासला धरण ते फुरसुंगी बोगदा (भुमिगत कालवा) झाल्यास बाष्पीभवन व वहनव्यय थांबून अंदाजे २.१८ अ.घ.फु.पाण्याची बचत होणार आहे. सदर पाणी ग्रामीण भागातील नवीन मुठा कालव्याच्या पुच्छ भागातील लाभधारकांना देणेसाठी उपलब्ध होईल.
(३) खडकवासला धरण ते फुरसुंगी बोगदा (भुमिगत कालवा) कामासाठी सर्वेक्षण व अन्वेषणाची कार्यवाही करून त्यानुसार प्रकल्प अहवाल तयार करावयाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर येथील मंदुप पोलीस ठाणे व पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या निवास्थानाच्या इमारतीबाबत**

**(३६) ५४३७० (१८-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघामध्ये सन १९०६ मध्ये बांधण्यात आलेली मंदुप पोलीस ठाणे येथील पोलीस ठाणे व पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्याची निवास्थांनाची इमारत जुनी झाली असून सदर बांधकाम १०० वर्षापेक्षाही जास्त कालावधी झाल्याने इमारती नादुरूस्त, जागा अपूरी पडत असल्याने मंदुप पोलीस ठाणे येथे सर्व सोयीसुविधांयुक्त अशी प्रशासकीय नवीन इमारत बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीयांनी माहे सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यंत्रीकडे मागणी केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचेकडून मंद्रुप पोलीस ठाणेची व निवासस्थांची प्रशासकीय नवीन इमारत बाधण्याबाबत अदाज पत्रक २०१७ मध्ये सादर करण्यात आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय आढळून आले तसेच सदरहू पोलीस ठाणे इमारत व पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची निवासस्थान बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे कार्यालयाने दि.१८.०७.२०१७ अन्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचेकडून मंद्रुप पोलीस ठाणेची व निवासस्थानाची नवीन इमारत बांधण्याबाबत अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून दि.०७.०२.२०२३ पत्रान्वये, सदर प्राधान्यक्रम यादीस शासन मान्यता दिलेली आहे. या यादीमध्ये मंद्रुप पोलीस ठाणेच्या प्रशासकीय इमारत व ६३ सेवा निवासस्थानांचा बांधकामाचा समावेश आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून सुरु आहे.

---

**शिरुर (जि.पुणे) वन परिमंडळ अधिकाऱ्याला लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत**

**(३७) ५४४०१ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) येथे झाडे तोडून वाहतूक करताना पकडलेला टेम्पो सोडण्यासाठी १० हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने वन परिमंडळ अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडल्याची घटना ऑक्टोबर २०२२ मध्ये वा दरम्यान घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर ठेकेदाराकडे नियमानुसार दंड भरूनही टेम्पो सोडवण्यासाठी सदर लाचेची रक्कम मागितली ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करून वन परिमंडळ अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३)

I. सदर प्रकरणी तक्रारदार/फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आरोपी लोकसेवकास वन क्षेत्रीय कार्यालय, शिरूर, पुणे परिसरामध्ये पंचासमक्ष रु.१०,०००/- रकमेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपी

लोकसेवकांविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक (सुधारणा २०१८) अधिनियम चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास ला.प्र.वि. पुणे यांच्यामार्फत चालू आहे.
II. तसेच उपवनसंरक्षक, घोड प्रकल्प, वन विभाग जुन्नर यांच्या दिनांक १९/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित आरोपी लोकसेवकास निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांझण डावा कालवा (गिरणा प्रकल्प) ची विशेष दुरूस्ती होणेबाबत.**

**(३८) ५४५८६ (२२-०१-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव, (जि.जळगाव) येथील गिरणा धरणातून निघणारा पांझण डावा कालवा हा एकूण ५३ कि.मी. लांबीचा असून त्यावर १४८९० हेक्टर सिंचन क्षेत्र अवलंबून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालवा हा ५० वर्षापूर्वी तयार झालेला असून सध्यास्थितीत तो फक्त ४० % क्षमतेने प्रवाहीत होत असुन कालव्यातून होणा-या गळतीमुळे फक्त ४०% सिंचन क्षेत्रास लाभ होत आहे व उर्वरित सिंचन क्षेत्रास पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कालव्याचे पूर्ण लांबीमध्ये काँक्रीट चे अस्तीकरण (Concrete Lining) होणे आवश्यक असून या कामास जवळपास रु. ५० कोटी खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर काम पूर्ण झाल्यास कालवा पूर्ण क्षमतेने प्रवाहीत होईल व सर्व प्रकल्पीय सिंचन क्षेत्रास लाभ होईल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२३) :** (१) होय
(२) अंशत: खरे आहे.सदर कालवा ५० वर्षापूर्वी तयार झालेला असून सद्य:स्थितीत तो ४० % क्षमतेने प्रवाहीत होत आहे. तथापि एकूण १४८९० हे. सिंचन क्षेत्रापैकी मागील तीन वर्षातील सरासरी प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र ९८९४ हे. (६६%) इतके होत आहे.
(३) अंशत: खरे आहे.क्षेत्रीय स्तरावर यापूर्वी अस्तरीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक करण्यात आले होते. त्याची ढोबळ अंदाजित किंमत रु. ५० कोटी होती. तथापि सदर अंदाजपत्रकावर पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. अस्तरीकरणाचे अंदाजपत्रक अद्यावत करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) होय
(५) शासनाच्या प्रचलित धोरण व नियमानुसार अस्तरीकरणाचे अद्यावत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मण्याड उजवा कालवा (मण्याड मध्यम प्रकल्प) ची विशेष दुरूस्ती होणेबाबत.**

**(३९) ५४५८७ (२२-०१-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव, (जि.जळगाव) येथील मण्याड धरणातुन निघणारा मण्याड उजवा कालवा हा एकूण २० कि.मी. लांबीचा असून त्यावर ४८६४ हेक्टर सिंचन क्षेत्र अवलंबून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालवा हा ५० वर्षापूर्वी तयार झालेला असून सध्यस्थितीत फक्त ५०% क्षमतेने प्रवाहीत होतो व कालव्यातून होणा-या गळतीमुळे उपलब्ध पाण्याचा सिंचनासाठी पुरेपूर विनियोग करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कालव्याचे ० ते २० कि.मी. लांबीमध्ये Concrete Lining व दुरूस्ती होणे आवश्यक असून या कामास जवळपास रु. १३.७५ कोटी खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर काम पूर्ण झाल्यास कालवा पूर्ण क्षमतेने प्रवाहीत होईल व सर्व प्रकल्पीय सिंचन क्षेत्रास लाभ होईल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) चाळीसगाव (जि.जळगाव) येथील मण्याड उजवा कालवा दुरुस्ती कामाच्या अनुषंगाने तपशिलवार अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलढाणा) येथील नळगंगा प्रकल्पाची देखभाल दुरुस्तीबाबत

**(४०) ५४९०४ (२२-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील नळगंगा प्रकल्पाची देखभाल दुरुस्तीसाठी मजुर दिली असून अद्यापर्यंत कामाला सुरुवात झाली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास,गत दोन वर्षापासून या प्रकल्पाच्या मुख्य द्वार व इतर ११ द्वारांची दुरुस्ती, ग्रीसिंग, ऑईलिंगची कामे झालेली नाहीत हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, जून, २०२२मध्ये कार्यकारी अभियंत्याकडून धरणाचे निरीक्षण करणे आवश्यक असताना सुद्धा धरणाचे निरीक्षण केले नसल्याचे ३१ ऑक्टोबर २०२२ चे जलसंपदा विभागाचे अभियंता निरीक्षण उपविभाग क्र.४ औरंगाबाद यांचे कडून करण्यात आलेल्या निरीक्षणामध्ये आढळून आले हेही खरे आहे काय?
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन नळगंगा प्रकल्पाची दुरुस्तीकरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
सन २०२२-२३ च्या रब्बी हंगामासाठी नळगंगा प्रकल्पाच्या कालव्याची देखभाल दुरूस्तीची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागामार्फत उपलब्ध सयंत्राद्वारे ३.११.२०२२ रोजी प्रत्यक्षात सुरू करण्यात आली होती.
(२) नाही, हे खरे नाही.
दोन वर्षापासून या प्रकल्पाच्या मुख्य द्वार व इतर ११ द्वारांची दुरूस्ती ग्रिसींग, ऑयलींगची कामे यांत्रिकी विभागाच्या नियोजित कार्यक्रमानुसार झालेली आहे.
(३) हे खरे नाही.
अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला यांचे मार्फत करण्यात आलेल्या दिनांक २९.४.२०२२ रोजीच्या

पावसाळा पूर्व धरण निरीक्षणाच्या वेळी कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा तसेच क्षेत्रिय अधिकारी उपस्थित होते.

(४) अधीक्षक अभियंता,अकोला सिंचन मंडळ, अकोला यांचेमार्फत दिनांक २९.४.२०२२ रोजी पावसाळा पूर्व धरण निरीक्षणाच्या वेळी कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा तसेच क्षेत्रिय अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रकल्पाच्या मुख्य द्वार व इतर ११ द्वारांची दुरूस्ती, ग्रिसींग, ऑइलींगची कामे यांत्रिकी विभागाच्या नियोजित कार्यक्रमानुसार मागील दोन वर्षात झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## अहमदनगर पोलिस मुख्यालयातील निवासस्थान व नविन कार्यालयीन इमारत बांधण्याबाबत

**(४१) ५५०४३ (२५-०१-२०२३). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर मतदार संघातील पोलिस मुख्यालयातील निवासस्थान व नवीन कार्यालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस महासंचालकांकडे माहे डिसेंबर, २०२१ पासून प्रलंबित असल्याचे निदर्शनस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही कामांची नावे पोलिस महासंचालकांकडील यादीमध्ये समाविष्ट असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर पोलिस मुख्यालयातील निवासस्थान व नवीन कार्यालयीन इमारत बांधण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. १३ डिसेंबर, २०२१ पासून आजतागायत लेखी स्वरुपात अनेकदा करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने पोलीस मुख्यालयातील निवासस्थान व नवीन कार्यालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करुन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :**(१) ,(२), (३), (४) व (५)

पोलीस अधीक्षक, अहमदनगर येथील अधिकारी व अंमलदार यांचेकरिता ६५० निवासस्थान बांधकाम आणि पोलीस मुख्यालय येथील मोटार परिवहन विभाग, कार्यशाळा इमारत बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून शासन पत्र दि.०७.०२.२०२३ अन्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. सदर यादीमध्ये अहमदनगर पोलिस मुख्यालयातील अधिकरी व अंमलदार यांचेकरिता ६५० निवासस्थानाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून निधी उपलब्धतेनुसार सुरु आहे.

---

## नेकनूर ( ता.जि. बीड) येथील पोलीस स्टेशन साठी नवीन इमारत व पोलीस क्वार्टरच्या बांधकामाला मंजुरी देणे बाबत.

**(४२) ५५१११ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर, (ता.जि. बीड) येथील पोलीस स्टेशनची इमारत अत्यंत जुनी असल्याने धोकादायक बनली आहे तसचे पोलिसांना राहण्यासाठी शासकीय घरे ही नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्टेशन व पोलिसांच्या घरांच्या बांधकामाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृह मंत्री यांचेकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :**(१) व (२) होय.
(३) व (४)
राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास शासन पत्र दि.०७.०२.२०२३ अन्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. सदर यादीमध्ये नेकनूर (त.जि. बीड) येथील पोलीस स्टेशन साठी नवीन इमारत व पोलीस सेवा निवासस्थान बांधण्याचा समावेश आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून निधीच्या उपलब्धतेनुसार सुरु आहे.

---

## अमळनेर येथील निवासस्थानाचे वीज मिटर बदलून देण्यासाठी लाच स्वीकारताना वरिष्ठ तंत्रज्ञ यांना अटक करण्यात आल्याबाबत

**(४३) ५६४४२ (२९-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर येथील क्रांती नगरातील रहिवाशी श्री. श्रीकांत अनिल पाटील यांच्या निवासस्थानांचे फॉल्टी वीज मिटर बदलून देणे व दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी ५ हजारांची लाच स्विकारतांना धुळयाच्या अॅटी करप्शन ब्युरोच्या पथकाने वीज वितरण कंपनीच्या अमळनेर शहर ( जि. जळगांव ) विभागाच्या वरिष्ठ तंत्रज्ञ भरत कैलास पाटील यांना दि.५.११.२०२२ रोजीच्या सुमारास रंगेहाथ अटक करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, त्यांचेवर आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) तक्रारदार श्री.श्रीकांत अनिल पाटील, कांतीनगर धुळे रोड अमळनेर जि.जळगांव यांनी दि.५/१२/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत पडताळणी केली असता, आलोसे संबंधित वरिष्ठ तंत्रज्ञ यांनी तक्रारदार यांचेकडे रु.५,०००/- रकमेच्या लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेवून त्यांच्या विरुध्द अमळनेर पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे दिनांक ६/१२/२०२२ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयात संबंधित आरोपी लोकसेवकास दिनांक ०६/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.
(२), (३) व (४)
I. सदर प्रकरणी संबंधित आलोसे वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा. वि.वि.कंपनी मर्या, अंमळनेर शहर कक्ष, जळगांव, यांचेविरुद्ध अंमळनेर पोलीस ठाणे जिल्हा-जळगांव येथे गुन्हा नोंद क्रमांक ५६२/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगांव यांच्याकडून सुरु आहे.
II. संबंधित आलोसे वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा. वि.वि.कंपनी मर्या, अंमळनेर शहर कक्ष, जळगांव, यांना मुख्य अभियंता, जळगाव परिमंडळ यांच्या कार्यालयाच्या दिनांक २०.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिनाक ०६.१२.२०२२ पासून पुढील आदेशापर्यंत कंपनीच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

## कन्नड (जि. औरंगाबाद) तालुक्यातील चिखलठाण येथून बेपत्ता झालेल्या दोन बहिणींचे मृतदेह विहिरीत आढळल्याबाबत

**(४४) ५६७३६ (२६-०४-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड (जि. औरंगाबाद) तालुक्यातील चिखलठाण येथून १४ जानेवारीला बेपत्ता झालेल्या दोन सख्ख्या बहिणींचे मृतदेह गावशिवारातील विहिरीतील पाण्यात दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३)

मयत मुलींच्या वडिलांनी त्यांच्या दोन मुली बेपत्ता असलेच्या दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १४.०१.२०२३ रोजी कन्नड पोलीस स्टेशनमध्ये मिसींग ०३/२०२३ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती.

सदर प्रकरणातील चौकशीदरम्यान वडीलांच्या घरामागील विहीरीत दिनांक १६.०१.२०२३ रोजी हरवलेल्या दोन्ही मुलींचे मृतदेह आढळून आले आहेत.

सदरच्या मुली शेतातील विहीरीचे बाजूला असलेले गवत कापणीसाठी गेले असावे व त्यांचा पाय घसरुन विहीरीत पडल्याने पाण्यात बुडून मृत्यु पावलेल्या असाव्यात, असे आतापर्यंतच्या तपासावरुन दिसून आले आहे. सदर अकस्मात मृत्युची पुढील चौकशी चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## मुंबई पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील वडाळा पोलीस स्टेशन ठाण्यासाठी स्वतंत्र इमारत उभारण्याबाबत

**(४५) ५७३६३ (३०-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट ट्रस्टच्या (बीपीटी) भूखंडावर बांधलेल्या इमारतीत १९६८ मध्ये वडाळा पोलीस स्टेशन सुरू करण्यात आल्यानंतर तांत्रिक अडचणींमुळे या मोडकळीस व अत्यंत धोकादायक इमारतीमध्ये पोलीस स्टेशन सुरू असल्याने येथील कर्मचारी वर्गांना तसेच पोलीस स्टेशनवर शासकीय कामासाठी येणा-या नागरिकांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडाळा येथील या धोकादायक इमारतीतील कारभार सुरू असून कामाचा वाढता व्यापयामुळे जागाही अपुरी पडत असल्याने जुन्या पोलीस ठाण्याची इमारत जमीनदोस्त करून त्या ठिकाणी नवीन सुसज्ज पोलीस स्टेशन उभारण्यात यावे, अशी सातत्याने प्रशासनाकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वडाळा पोलीस स्टेशनसाठी नवीन इमारत उभारणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) व (४)

वडाळा पोलीस ठाणे आणि पोलीस वसाहत पुनर्विकास प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण

महामंडळ मर्या. यांचेकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचे जागेची मालकी मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचे नावे नोंद असून, त्याचे कार्यालयामार्फत "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. जागा व निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### मिरज (जि.सांगली) येथे खाजगी व्यक्तीने जेसीबीच्या सहाय्याने ग्रामस्थांची घरे पाडल्याबाबत

**(४६) ५७३९८ (२६-०४-२०२३). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथे खाजगी व्यक्तीने शेकडो समर्थकांचा जमाव जमवून व दहशत निर्माण करून कोणतेही प्रशासकीय अधिकार नसताना गोरगरीब लोकांची दुकाने, हॉटेल, घरे जेसीबीच्या सहाय्याने पाडून टाकल्याची घटना दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेनंतर मिरज येथील सर्वपक्षीय नागरिकांनी दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी शहर बंद ठेवून रॅली द्वारे निषेध केला व सदर घटनेतील गुन्हेगारांवर कठोर कारवाईची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेवेळी झालेला हाणामारी व दगडफेकी मध्ये नागरी वस्तीतील अनेक लोक जखमी झाले तसेच झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या गरीब लोकांच्या प्रापंचिक साहित्याचे मोठे नुकसान झाले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सर्व राजकीय पक्षांकडून मिरज शहर बंद ठेवण्याबाबत नागरिकांना आव्हान करण्यात आले होते, परंतु त्यास नागरिकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. तसेच मिरज शहर येथे कोणत्याही प्रकारची रॅली काढण्यात आलेली नाही. तथापि, गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(३) सदर घटनेत एका व्यक्तीस किरकोळ दुखापत झाली असून कोणतेही प्रापंचीक साहित्याचे नुकसान झालेले नाही. तथापि, दुकाने, हॉटेल इत्यादी व्यावसायिकांच्या मालमत्तेचे अंदाजे १ कोटी १३ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

(४) सदर घटनेबाबत मिरज पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.८/२०२३ भा.दं.वि कलम १४३, १४७, १४८, १४९, ४४७, ३३६, ३२४, ३२३, ४२७, ५०४, व ५०६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ७/२०२३ भा.दं.वि. कलम २३४,१४३,१४९,४२७ प्रमाणे गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील आश्रमशाळेसाठी शासकीय पोर्टलचा वापर न करता खरेदी करण्यात आलेल्या पंख्यांबाबत

**(४७) ५७४२० (२७-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील आश्रमशाळेसाठी शासकीय पोर्टलचा वापर न करता निकृष्ट दर्जाचे व अधिक किंमत देऊन खरेदी केलेले पंखे वर्षभरातच बंद पडले असून काही पंखे जळाले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व केलेल्या चौकशीनुसार आढळून आलेल्या संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०९-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत असलेल्या मेळघाट क्षेत्रातील २ शासकीय आश्रमशाळा स्तरावर शाळा सुधार समिती (SMC) अंतर्गत प्राप्त निधीतुन आवश्यकतेप्रमाणे पंखे खरेदीची कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) सदर मुख्याध्यापक स्तरावर झालेल्या खरेदीबाबत चौकशी करण्यासाठी लेखाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करुन चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्याच्या प्रकल्प अधिकारी, धारणी यांनी सुचना दिलेल्या आहेत.
(३) गठीत समितीचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळल्यास संबंधीतावर प्रचलित नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्य मुंबईतील वरळी, ना.म.जोशी मार्ग आणि नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुर्नविकासाबाबत**

**(४८) ५८८५३ (०२-०५-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उच्च न्यायालयाने दि.१२ जानेवारी, २०२३ रोजी व त्या सुमारास स्व.बाळासाहेब ठाकरे नगर, वरळी, स्व.राजीव गांधीनगर, ना.म.जोशी मार्ग, आणि शरद पवार नगर, नायगाव येथील बीडीडी चाळ पुर्नविकास प्रकल्पातील नव्या इमारतींचे मंजूर बांधकाम आराखडे हे डीसीपीआर व डीसीआरच्या तरतुदींशी विसंगत असल्याचे आणि काहीही नियमबाहय असल्याचे दिसत नाही असे स्पष्ट करुन प्रकल्पाविरुध्द आलेली याचिका निकाली काढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पाच्या नावामध्ये बदल करण्याबाबत राज्य शासनाचा विचार असल्यामुळे सदर प्रकल्पाबाबत शासनाने अद्याप पुढील कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयाच्या निर्णयानंतर सदरच्या प्रकल्पातील कामांच्या प्रगतीबाबत सद्यस्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प कालबद्धरित्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) तत्कालीन मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी सन २०२२ च्या विधिमंडळाच्या अधिवेशनात बी.डी.डी. चाळींचे नामकरण करण्याचे जाहिर केले. त्यानुषंगाने निर्गमित केलेल्या दि. ३/६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बी.डी.डी. चाळ प्रकल्पांचे पुढील प्रमाणे नामकरण करण्यात आले आहे :-
१) बी.डी.डी. चाळ, वरळी - स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे नगर
२) बी.डी.डी. चाळ, ना.म. जोशी मार्ग - स्वर्गीय राजीव गांधी नगर
३) बी.डी.डी. चाळ, नायगांव - श्री.शरद पवार नगर
(३) ते (५) वरळी येथील बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पामधील पुनर्वसन इमारत क्र. १ मधील एकूण ८ विंग पैकी "डी" विंगचे बांधकाम १२ मजल्यापर्यंत, "ई"विंगचे बांधकाम ५ मजल्यापर्यंत व इतर ६ विंगच्या पायाभरणीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

बी.डी.डी. नायगांव चाळींचा पुनर्विकास दोन टप्प्यात पूर्ण करण्याचे नियोजित असून पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात प्रथमतः जुन्या १२ चाळींच्या जागेवर ८ पुनर्वसन इमारती बांधण्याचे नियोजित असून येथील ५ चाळी तोडण्यात आल्या आहेत. चाळी तोडलेल्या जागेवर ४ पुनर्वसन इमारतींचे (टी-४, टी-५, टी-६, टी-८) जोत्याखालील काम प्रगतीपथावर आहे.

ना.म.जोशी मार्ग येथील पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत येणा-या १० चाळींपैकी ७ चाळी जमीनदोस्त केल्या आहेत. सदर चाळी तोडून उपलब्ध झालेल्या मोकळया जागेत शोअर पाईलींग तसेच प्रत्यक्ष खोदकामास सुरुवात करण्यात आली आहे.

सदरहू प्रकल्पाचे बांधकाम दोन टप्प्यांमध्ये करण्यात येत असून अंदाजे सन २०२८ ते २०३० च्या दरम्यान पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## दादर येथील गणपती विसर्जनादरम्यान झालेल्या गोळीबाराबाबत

**(४९) ५८८५४ (३०-०४-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथे गणपती विर्सजनादरम्यान दोन गटातील भांडणामध्ये दादर पोलीस ठाण्याच्या आवारात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आपल्या स्वत:च्या अनुज्ञप्ती असलेल्या बंदुकीतून गोळीबार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक विधानसभा सदस्यावर शस्त्रबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घटनास्थळी पोलिसांनी जप्त केलेली बंदुकीच्या गोळीची पुंगळी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे पिस्तूल फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविल्यानंतर सदरहू गोळी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे बंदुकीतून सुटलेली आहे हे प्रयोगशाळेतील अहवालातून सिध्द झाले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांचेवर दोषारोपपत्र सादर करणे आवश्यक असताना विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

लोकप्रतिनिधी यांच्या स्वतःच्या अनुज्ञप्ती असलेल्या बंदूकीतून अन्य इसमाकडून गोळीबार झाला आहे.

(२) होय.

लोकप्रतिनिधी व इतर १० जणांविरोधात दादर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५७१ /२०२२ (सीसीटीएनएस नं. ०७१४/२०२२) भादंवि कलम १४३, १४४,१४५, १४७, १४८, १४९, ३३६, १८६, ५०४, ५०६, सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ सह मपोका कलम ३७(१) १३५ अन्वये दि. ११/०९/२०२२ रोजी दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(३) होय.

(४) व (५) हे खरे नाही.

लोकप्रतिनिधी व इतर आरोपींना सी.आर.पी.सी. ४१ (अ) (१) अन्वये नोटीस देण्यात आली असून, मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## गोरेगाव पश्चिम येथील मोतीलाल नगर क्र. १,२,३ चा पुनर्विकास म्हाडा मार्फत केला जाणा-या प्रक्रियेमध्ये रहिवाश्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(५०) ५९०९७ (२५-०४-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव पश्चिम येथील मोतीलाल नगर क्र. १,२,३ चा पुनर्विकास मागील बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्विकास हा म्हाडा मार्फत केला जात असून पुनर्विकासाच्या प्रक्रियेमध्ये म्हाडाकडून रहिवाश्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप रहिवाशी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने या पुनर्विकास प्रक्रियेतील पारदर्शकता रहिवाश्यांसमोर यावी याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२३) :** (१) ते (४) मोतीलाल नगर १,२ व ३ गोरेगाव (प.) येथील पुनर्विकास प्रकल्प मंत्रिमंडाळाच्या मान्यतेने निर्गमित केलेल्या शासन निर्णय दि.६/१०/२०२१ अन्वये राबविण्यात येत आहे. सदर पुनर्विकास प्रकल्पाबाबत मोतीलाल नगर गोरेगाव येथे सर्व रहिवाशांना म्हाडामार्फ़त माहिती देण्यात आली आहे. तसेच विविध रहिवाशी संघटनेच्या प्रतिनिधींसोबतही म्हाडा कार्यालयात बैठका घेऊन त्यांना पुनर्विकासाबाबत माहिती देण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या दि.१७/१०/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार मोतीलाल नगर क्र.१,२ व ३ येथील पुनर्विकास कार्यान्वित करण्याकरीता Construction and Development Agency ची नेमणूक प्रस्तावित असून, मा. उच्च न्यायालयाने मंजूरी दिल्यानंतर Financial Bid उघडून C & DA ची नेमणूक करुन पुनर्विकासाचे काम सुरु करण्यात येणार आहे. सदर प्रकरण अद्याप मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.